**GOVERNNMENT OF MAHARASHTRA** 2783/JS(M)/2012
19/11/2012

Sl. No. 350 (R)

**No.** NUR – 2010/ C.R: 191/ UD-33 790
Urban Development Department,
MUINFRA, Ground Floor, cr-2,
Inox Building, Barrister Rajni Patel
Road, Nariman Point,
Mumbai 400 021,
**Dated** :- 30th October, 2012.

**To,**

**Ms. Nisha Singh,**
Joint Secretary (Mission Director)
Government of India,
Ministry of Urban Development,
Nirman Bhavan,
New Delhi.

**Subject** :- Constitution of the Committee at District level headed by the Member of Parliaments (MPs) to review and monitor implementation of projects and reforms under JNNURM.

**Reference** :- 1) Order from Government of India, Ministry of Urban Development, New Delhi, No. K-14012/101/18/2010 NURM II, dated 28/11/2011.
2) Letter from Government of India No. K-14012/101(3)/ 2011-NURM-II

**Respected Madam,**

I am directed to invite your kind attention to the aforesaid letters and enclose a copy of the Government Resolution NUR-2010/C.R 191/UD-33, dated 27th August, 2012 with reference to the reconstitution of the District Level Review and monitoring committee under the JNNURM project for your kind perusal.

Thanking You,

Yours faithfully,

(Signature)

**(Seema Dhamdhere)**
**Joint Secretary,**
**Urban Development Department**

Dir. (N.V)

US(N-II) 23/11/12

U.b.o.

SO(N-II) 26/11

G:\Letter\English letter.docx

**जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत जिल्हास्तरीय पुनर्विलोकन व संनियंत्रण समितीची स्थापना.**

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र.एनयुआर २०१०/प्र.क्र.१९१/नवि-३३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : २७ ऑगस्ट, २०१२.

संदर्भ:- १) शासन निर्णय सम क्रमांक दि. २५.१०.२०१०
२) केंद्र शासनाच्या शहरी विकास मंत्रालयाचे आदेश क्र. के-१४०१२/ १०१ (१८) / २०१० - एनयुआरएम-II दि. २८.११.२०११
३) केंद्र शासनाच्या संसदीय कार्य विभागाचे आदेश क्र.एफ.२-४४(१) / २०११- सीबी, दि.२९.९.२०११

**प्रस्तावना:-** केंद्र शासनाने देशातील नागरीकरणाचा वेग व व्याप्ती लक्षात घेऊन "जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान" हा महत्वाकांक्षी अभियान हाती घेतले आहे, या अभियानांतर्गत दोन प्रमुख उपअभियानाचा समावेश करण्यात आला आहे.

(१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान (नागरी पायाभूत सोयी सुविधा)
(२) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान (नागरी क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील समुहांसाठी मुलभूत सेवा उपलब्ध करणे)

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान या अंतर्गत मंजूर असलेल्या प्रकल्पांवर जिल्हास्तरावरुन संनियंत्रण ठेवण्याची व त्याची योग्य अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या न.वि. मंत्रालय क्रमांक के १४०१२/१०१/(१८)/२०१० NURM II (पार्ट/III) दि. ०४/०६/२०१० च्या पत्रातील सुचनेनुसार संदर्भाधीन शासन निर्णय क्र.(१) अन्वये जिल्हास्तरावरील पुनर्विलोकन व संनियंत्रण समित्या संबंधित जिल्हयाच्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आल्या होत्या. तथापि केंद्र शासनाने संदर्भाधीन आदेश क्र. (२) अन्वये सदर समित्यांची पुनर्रचना करण्याबाबत राज्य शासनास निर्देशीत केलेले आहे. त्या अनुषंगाने समित्यांची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. राज्य शासनाने केंद्र शासनाच्या सुचनांनुसार सदर समित्यांची पुनर्रचना पुढीलप्रमाणे करण्याचा निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-** जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत राबविण्यात येणा-या प्रकल्पांचे योग्य संनियंत्रण व अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे संदर्भाधीन शासन निर्णय क्र. (१) अधिक्रमीत करुन पुढीलप्रमाणे "जिल्हास्तरीय पुनर्विलोकन व संनियंत्रण समिती" ची स्थापना करण्यास शासन मान्यता देत आहे. या समितीची रुपरेषा, समितीचे सदस्य, उद्दिष्टे व कार्यकक्षा इत्यादी बाबी खालीलप्रमाणे राहतील.

०२. **समितीची संरचना**

**I) समितीचे अध्यक्ष -**

i) ज्या जिल्हयांमध्ये लोकसभेचे एकच सदस्य असतील अशा जिल्हयांमध्ये जरी सदर सदस्य लोकसभेचे मा. सभापती / मा. उपसभापती किंवा केंद्रीय मंत्रिमंडळात मा. मंत्री असतील तरी त्या लोकसभा सदस्यास समितीचे अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित करण्यात यावे.

ii) ज्या जिल्हयांमध्ये एकापेक्षा अधिक लोकसभा सदस्य असतील आणि जर त्यापैकी कोणी सदस्य मा.सभापती/ मा.उप सभापती, लोकसभा किंवा मा.केंद्रीय मंत्री असतील तर त्यांना सदर समितीचे अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित करण्यात यावे. मात्र जर लोकसभा सदस्यांमध्ये जर उपरोक्त पदाधिकारी समाविष्ट नसल्यास ज्या लोकसभा सदस्याच्या मतदार संघात जिल्हयांतील जास्तीत जास्त भौगोलिक

192



प्रदेश / जिल्हयातील विधीमंडळाच्या मतदारसंघाचा समावेश प्रतिनिधीत्व करत असेल अशा लोकसभा सदस्यांना अध्यक्ष म्हणुन नामनिर्देशीत करण्यात यावे व अन्य लोकसभा सदस्यांना सह अध्यक्ष म्हणून नामनिर्देशीत करण्यात यावे.

iii) जर एकच लोकसभा सदस्य एकापेक्षा अधिक जिल्हयांचे प्रतिनिधीत्व करत असतील तर त्यांना ते प्रतिनिधीत्व करत असलेल्या सर्व जिल्हयांमधील समित्यांचे अध्यक्ष म्हणून नामनिर्देशीत करण्यात यावे.

iv) राज्याचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या राज्यसभा सदस्यांना जिल्हास्तरीय समित्यांचे उपाध्यक्ष म्हणून (प्रथम इच्छुकतेच्या आधारे) उपाध्यक्ष म्हणून नामनिर्देशीत करण्यात यावे. अन्य संसद सदस्यांना सह अध्यक्ष म्हणून नामनिर्देशीत करण्यात यावे. (या संदर्भात केंद्र शासनाच्या संदर्भाधीन आदेश क्र.(३) ची प्रत सोबत परिशिष्ट-१ येथे जोडली आहे त्यातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.)

जर अध्यक्ष उपस्थित नसतील तर उपस्थित सदस्य त्यांच्यातील एकाची पुर्वनियोजित बैठकीच्या वेळी कामकाज पाहण्यासाठी अध्यक्ष म्हणून निवड करतील.

**II) समितीचे सदस्य-**

i) संबंधित जिल्हयात मतदार संघ असलेले लोकसभा सदस्य व संबंधित जिल्हयाविषयी पसंती दर्शविलेले राज्य सभा सदस्य .

ii) जिल्हयातील सर्व राज्य विधी मंडळ सदस्य

iii)जिल्हयातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे महापौर, नगराध्यक्ष, आयुक्त, मुख्याधिकारी

iv) जिल्हयातील प्रकल्प अधिकारी (DUDA)

v) केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाकडून नामनिर्देशित जिल्हयातील नामांकीत स्वयंसेवी संस्थेचा सदस्य

vi) केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाकडून नामनिर्देशित सामाजिक कार्य / समाजशास्त्र या क्षेत्रातील तज्ञ

vii) केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाकडून नामनिर्देशित अनुसूचित जाती / जमाती व महिला यामधील प्रत्येकी एक सदस्य

**III) सदस्य सचिव- जिल्हाधिकारी**

**०३. <u>समितीची उद्दिष्टे</u>**

१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाखालील प्रकल्पांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीचा आढावा घेणे.

२) अभियानांतर्गत सुधारणांच्या प्रगतीचा आढावा घेणे.

३) प्रकल्पांच्या व सुधारणांच्या अंमलबजावणीतील अडथळयांचे पुर्नविलोकन करुन ते दूर करण्यासाठी प्रयत्न करणे.

४) युआयजी / युआयडीएसएसएमटी व बीएसयुपी / आयएचएसडीपी खालील प्रकल्पं तसेच जिल्हास्तरावरील इतर महत्वपूर्ण योजनांमध्ये समन्वय साधणे.

**०४. <u>समितीची कार्यकक्षा</u>**

१) प्रस्तुत समिती दर तीन महिन्यांनी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाखालील प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा व सुधार कार्यक्रमाचा आढावा घेईल.

२) प्रस्तुत समिती या आढावा बैठकींचे इतिवृत्त शासनास, राज्यस्तरीय नोडल एजन्सीस व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस सादर करेल. इतिवृत्ताच्या अनुषंगाने आवश्यकता भासल्यास सदर समिती महत्वाच्या बाबींवर शिफारशीही करेल.

३) या बैठकांचे इतिवृत्त संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी राज्यस्तरीय नोडल एजन्सीची राहील व नोडल एजन्सी या इतिवृत्ताची प्रत केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाला तसेच गृहनिर्माण मंत्रालयास सादर करेल.

४) सदर समितीने सुचविलेल्या शिफारशींवर योग्य ती कार्यवाही करण्याची जबाबदारी राज्यस्तरीय नोडल एजन्सी यांची राहील व शिफारशींच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य स्तरीय नोडल एजन्सी केंद्र शासनाचा नगर विकास मंत्रालय, गृहनिर्माण व नागरी दारिद्रय निर्मूलन मंत्रालयास व राज्य शासन यांना सादर करेल.

५) सदर समितीने केलेल्या शिफारशींवरील कार्यवाहीचा अहवाल हा सदर समितीच्या पुढील बैठकीच्या कार्यसूचीमध्ये प्राधम्यक्रमाने विचारार्थ घेतला जाईल. संदर्भाधिन क्रमांक ३ येथील केंद्र शासनाचे आदेशातील तरतूदीचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी जिल्हास्तरीय समितीचे सदस्य सचिवांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सीमा ढमढेरे )
सह सचिव, नगर विकास विभाग.

प्रत--

मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव (नवि-१)
प्रधान सचिव (नवि-२)
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिवं, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई
आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई
विशेष कार्यकारी अधिकारी (जेएनएनयुआरएम) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
आयुक्त, सर्व महानगरपालिका
मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती.

----------